**<u>ठळक बातम्या</u>**

- विधानसभा निवडणुकीसाठी अर्ज भरण्याच्या आजच्या शेवटच्या दिवशी विविध राजकीय पक्षांच्या उमेदवारांकडून अर्ज दाखल

- अखेरच्या दिवशीही उमेदवार याद्या जाहीर / अनेक ठिकाणी उमेदवारी न मिळालेल्यांची उघड नाराजी

- आरोग्याशी संबंधित १२ हजार ८५० रुपये खर्चाच्या विविध विकास कामांचं प्रधानमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन आणि भूमिपूजन

**आणि**

- धनत्रयोदशीनिमित्त राज्यात सर्वत्र धन, धान आणि धन्वंतरी पूजन

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीसाठी अर्ज भरण्याच्या आजच्या शेवटच्या दिवशी विविध राजकीय पक्षांचे उमेदवार आपापले अर्ज दाखल करत आहेत. भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज शक्तिप्रदर्शन करत कामठी मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केला. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी साकोलीतून अर्ज भरला. शिवसेनेच्या मनीषा वायकर यांनी जोगेश्वरी पूर्वमधून काल तर, संजय शिरसाट यांनी छत्रपती संभाजीनगर पश्चिममधून अर्ज दाखल केला. भाजपाच्या हेमंत रासने यांनी पुण्याच्या कसबा पेठ मतदारसंघातून, तर राष्ट्रवादी काँग्रेसचे सुनील टिंगरे यांनी वडगांव शेरीतून उमेदवारी अर्ज दाखल केला. इतरही उमेदवार आज अर्ज भरणार आहेत.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीसाठी विविध राजकीय पक्ष आपापल्या उमेदवारांच्या याद्या जाहीर करत आहेत. शिवसेनेनं काल १५ उमेदवारांची तिसरी यादी काल जाहीर केली. यात शायना एन. सी. यांना मुंबादेवीतून उमेदवारी देण्यात आली आहे. याशिवाय, शिवसेनेच्या दोन सहयोगी पक्षांचे उमेदवार आणि मतदारसंघांचाही समावेश या यादीत आहे. जनसुराज्य पक्षाचे अशोक माने हातकणंगले इथून, तर राजर्षी शाहूविकास आघाडीचे राजेंद्र येड्रावकर शिरोळमधून निवडणूक लढवणार आहेत. काँग्रेसनं चार उमेदवारांची यादी काल जाहीर केली. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेनंही काल १८ उमेदवारांची सातवी यादी प्रसिद्ध केली. राष्ट्रवादी काँग्रेसनं चौथ्या यादीत मोर्शीमधून देवेंद्र भुयार, तर भोरमधून शंकर मांडेकर यांना उमेदवारी जाहीर केली. दरम्यान, भारतीय जनता पक्षानं आज जाहीर केलेल्या यादीनुसार उमरेडमधून सुधीर पारवे, तर मीरा भाईंदरमधून नरेंद्र मेहता यांना उमेदवारी दिली आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेनं भाजपमधून आलेल्या तृप्ती सावंत यांना वांद्रे पूर्व मतदारसंघातून निवडणुकीच्या रिंगणात उतरवलं आहे.

दुसरीकडे उमेदवारीसाठी इच्छुक पण संबंधित राजकीय पक्षाकडून तिकिट न मिळालेले काही उमेदवार नाराजी व्यक्त करताना दिसत आहेत. पालघरमधे निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक श्रीनिवास वनगा यांना माध्यमांसमोर नाराजी व्यक्त केली. काल संध्याकाळपासून ते बेपत्ता झाले असल्याचं आमच्या पालघरच्या वार्ताहरानं कळवलं आहे. पोलीस वनगा यांचा शोध घेत आहेत. दरम्यान, भाजपाचे माजी खासदार गोपाळ शेट्टी यांनी बोरीवलीतून, माजी आमदार अतुल शहा यांनी मुंबादेवी तर घाटकोपर पूर्वमधून भाजपाच्याच प्रकाश मेहता यांनी अपक्ष म्हणून अर्ज दाखल केला.

**<><><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज **छत्रपती संभाजीनगर** जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><><>**

महायुती सरकारने लाडक्या बहिण योजनेद्वारे महिलांना पंधराशे रुपये दिले असले तरी गेल्या २ महिन्यात महागाईत वाढ झाली असल्याची टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे. महायुतीने काँग्रेसच्या विरोधात प्रसारित केलेल्या व्हिडीओला उत्तर देताना ते बोलत होते. महाराष्ट्रात लहान मुलीवर अत्याचार होत असून राज्यात महिला मुली सुरक्षित नाहीत, त्यामुळे राज्यातल्या महिला महाविकास आघाडी सोबत असल्याचा दावा पटोले यांनी केला.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज दूरदृष्य प्रणालीद्वारे विविध सरकारी विभाग आणि संस्थांमध्ये नियुक्ती मिळालेल्या ५१ हजारांहून अधिक तरुणांना नियुक्ती पत्रांचं वितरण केलं. तरुणांना कायमस्वरुपी नोकऱ्या देण्यासाठी आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी सरकारचे प्रयत्न सुरू असल्याचं त्यांनी यावेळी म्हटलं. हा रोजगार मेळावा देशभरात ४० ठिकाणी आयोजित केला जात आहे. केंद्र सरकारच्या विविध मंत्रालय आणि विभागांमध्ये नवनियुक्त कर्मचाऱ्यांना कर्मयोगी प्रारंभच्या माध्यमातून मूलभूत प्रशिक्षण घेण्याची संधी मिळणार आहे. नवनियुक्त

कर्मचाऱ्यांना प्रशिक्षणासाठी कर्मयोगी पोर्टलवर ऑनलाइन मॉड्युल आणि एक हजार चारशेहून अधिक अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.

**<><><><><>**

भारत आणि स्पेन यांच्यात विविध क्षेत्रांमध्ये दीर्घकालीन आणि सशक्त भागीदारी आहे, असं केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी सांगितलं. मुंबई इथं भारत-स्पेन सीईओ फोरमला ते आज संबोधित करत होते, यावेळी स्पेनचे राष्ट्राध्यक्ष पेद्रो सांचेझ उपस्थित होते. दळणवळण, पायाभूत सुविधा आणि उत्पादन या क्षेत्रांमध्ये दोन्ही देशांची भागीदारी शाश्वत आणि सर्वसमावेशक विकासाला चालना देईल, असं गडकरी म्हणाले.  अशा आर्थिक संबंधांना बळकटी देण्यासाठी हा संवाद मदत करेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

**<><><><><>**

आयुर्वेदाला आधुनिक वैद्यकशास्त्राशी जोडून आरोग्य क्षेत्रात एक नवा अध्याय सुरू झाला असून आता आयुर्वेद क्षेत्रात नवं संशोधन होईल, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. धन्वंतरी दिन आणि नवव्या आयुर्वेद दिनानिमित्त नवी दिल्ली इथं आरोग्याशी संबंधित जवळपास १२ हजार ८५० कोटी रुपयांच्या योजनांचा प्रारंभ प्रधानमंत्र्यांच्या हस्ते झालं त्यावेळी ते बोलत होते. ज्या देशाचे नागरिक निरोगी असतात त्या देशाची प्रगती वेगाने होते, असं प्रधानमंत्री म्हणाले. प्रतिबंधात्मक उपाय, वेळेवर रोगाचं निदान, मोफत आणि स्वस्त उपचार, छोट्या शहरांमध्ये डॉक्टरांची कमतरता दूर करणं आणि आरोग्य सेवेत तंत्रज्ञानाचा विस्तार हे आरोग्य धोरणाचे पाच स्तंभ केंद्र सरकारने ठरवले आहेत, असंही प्रधानमंत्र्यांनी सांगितलं.

या कार्यक्रमात आज प्रधानमंत्र्यांच्या हस्ते आरोग्य सेवा आणखी सुधारण्यासाठी विविध आरोग्य संस्थांचं उद्घाटन आणि पायाभरणीही झाली. या टप्प्यात एक पंचकर्म रुग्णालय, एक क्रीडा वैद्यक संस्था, एक केंद्रीय वाचनालय, एक आयटी आणि स्टार्टअप इन्क्यूबेशन सेंटर आणि ५०० खाटांच्या रुग्णालयाचा समावेश आहे. याव्यतिरिक्त विविध राज्यांमधल्या आरोग्याशी संबंधित इतर अनेक संस्था आणि उपक्रमांचाही त्यांनी दूरस्थ पद्धतीनं प्रारंभ केला. केंद्रीय रसायन आणि उर्वरक मंत्री जे. पी. नड्डा, केंद्रीय श्रम आणि रोजगार तसंच युवक कल्याण मंत्री मनसुख मांडवीय, तसंच केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री अनुप्रिया पटेल आणि खासदार शोभा करंदलाजे यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

देशभरात आज दिवाळीचा दुसरा दिवस म्हणजेच धनत्रयोदशी साजरी होत आहे. आजच्या दिवशी धनाची आणि धानाची तसंच देवांचे वैद्य असलेल्या धन्वंतरींची पूजा आज केली जाते. धणे आणि गूळ यांचा नैवेद्य दाखवला जातो. या निमित्ताने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. भगवान धन्वंतरींच्या कृपेमुळे सर्वांना आयुष्य, आरोग्य, आनंद आणि समृद्धी लाभो, अशी शुभकामना करतो, असं प्रधानमंत्र्यांनी त्यांच्या समाज माध्यमावरच्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. आज साजऱ्या होणाऱ्या आयुर्वेद दिनानिमित्तही प्रधानमंत्र्यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात शुभेच्छा दिल्या आहेत. निरोगी जीवनशैलीसाठी आयुर्वेद उपयुक्त ठरतो. भगवान धन्वतंरींची जयंती ही आयुर्वेदाच्या उपयुक्ततेशी आणि योगदानाशी निगडित असल्याचं प्रधानमंत्री आपल्या शुभेच्छा संदेशात म्हणाले आहेत.

**<><><><>**

नाशिकच्या आरोग्य विज्ञान विद्यापीठात आज राष्ट्रीय आयुर्वेद दिन साजरा करण्यात आला. राष्ट्रीय आयुर्वेद दिनानिमित्त विद्यापीठ प्रशासकीय इमारतीच्या प्रवेशव्दाराजवळ भगवान धन्वंतरीचं कुलगुरु लेफ्टनन्ट जनरल माधुरी कानिटकर आणि इतर मान्यवरांच्या हस्ते पूजन करण्यात आलं.

**<><><><>**

देशांतर्गत सराफा बाजारात आज धनत्रयोदशीच्या दिवशी सोन्याच्या किमतीत प्रतितोळा ५०० रुपयांची घट झाली आहे. २४ कॅरेट सोन्याची किंमत आज ८० हजारांवरून घसरून ७९ हजार ७९० रुपये झाली आहे तर २२ कॅरेट सोन्याचा दर ७३ हजार १४० रुपये झाला आहे. चांदीच्या दरात मात्र कोणताही बदल झालेला नसून चांदीचा दर ९७ हजार ९०० रुपये प्रतिकिलो इतका आहे.

**<><><><>**

नंदुरबार इथं आज एका तलवार बनवण्याच्या कारखान्यावर छापा टाकत पोलिसांनी २३ तलवारी एक गुप्ती आणि दोन चाकू जप्त केले. या प्रकरणी सात जणांना अटक करण्यात आली आहे. या कारख्यान्यातून किती तलवारींची विक्री झाली याचा शोध पोलीस घेत आहेत.

**<><><><>**

भारत आणि न्यूझीलंडच्या महिला क्रिकेट संघांदरम्यान एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेतला तिसरा आणि अंतिम सामना अहमदाबादमध्ये सुरू आहे. न्यूझीलंड संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हां, न्यूझीलंडच्या २१ षटकांत ४ बाद ७७ धावा झाल्या होत्या.

दोन्ही संघांनी आधीचे एक एक सामने जिंकून बरोबरी साधली असल्यामुळे आजचा सामना जिंकून मालिका जिंकण्याचा दोन्ही संघ प्रयत्न करतील.

**//<><><><><>//**